RELIANCE
Infrastructure

## सभासदांना सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सूचनेत मांडलेल्या कामकाजाच्या बाबी करण्याकरिता **रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड** ("कंपनी")च्या सभासदांची ९० वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) सोमवार, सप्टेंबर ३०, २०१९ रोजी स. ११.१५ वा किंवा त्याच दिवशी रिलायन्स कॅपिटल लिमिटेडची एजीएम संपल्यावर रमा अँड सुंद्री वाटूमल ऑडिटोरियम विद्यासागर, प्रिन्सिपल के. एम. कुंदनानी चौक, १२४, दिनशा वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई - ४०००२० येथे होणार आहे.

अन्य बाबींसह तेथे करावयाचे कामकाज मांडणारी एजीएम निमंत्रणाची सूचना असणाऱ्या संक्षिप्त वार्षिक अहवाल, ३१ मार्च, २०१९ रोजीस संक्षिप्त ताळेबंद, त्याच तारखेस संपलेल्या आर्थिक वर्षासाठी संक्षिप्त नफा आणि तोटा पत्रक व संक्षिप्त रोख तरलता विवरण, त्यावरील स्वतंत्र लेखापरीक्षकांचा अहवाल आणि संचालक मंडळाचा अहवाल त्यासहित संक्षिप्त एकत्रित वित्तीय विवरण आणि रिमोट ई-व्होटिंग फॉर्म सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पोस्ट/कुरियर द्वारा आणि ज्यांनी त्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेस डिपॉझिटरीज/कंपनीकडे नोंदवले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवले आहेत.

एजीएमच्या सूचनेत मांडलेल्या कमाकाजाच्या बाबी रिमोट ई-व्होटिंगद्वारे त्याच प्रमाणे एजीएमच्या ठिकाणी मतदानाद्वारे करता येतील. ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेसेस नोंदवले आहेत त्यांना वार्षिक अहवाल आणि रिमोट ई-व्होटिंग फॉर्म इलेक्ट्रॉनिक पध्दतीनेही पाठविले आहे. ज्या सभासदांनी अजुनपर्यंत त्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेसेस नोंदविलेले नाहीत त्यांनी कृपया त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट मार्फत डिपॉझिटरीकडील त्यांच्या इलेक्ट्रॉनिक होल्डिंग्जच्या संबंधात तसे करावे. ज्या सभासदांनी प्रत्यक्ष पध्दतीने शेअर्स धारण केले असतील त्यांनी कृपया त्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेसेस कंपनीच्या रजिस्ट्रार अँड ट्रान्स्फर एजंट, कार्व्ही फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड ("कार्व्ही") कडे नोंदवावेत.

एजीएममध्ये हजर राहून मत देण्यास हक्कदार असलेले सभासद त्याच्या/तिच्या स्वतःच्या ऐवजी हजर राहून मतदानाच्या वेळी मत देऊ शकणाऱ्या एका प्रतिपत्रीची नेमणूक करण्यास हक्कदार असतील आणि प्रतिपत्रीने कंपनीचा सभासद असण्याची गरज नाही. प्रतिपत्रीची नेमणूक करणारा संलेख परिणामस्वरूप होण्यासाठी, रितसर भरून व स्वाक्षरी करून कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात एजीएम सुरू होण्यापूर्वी किमान ४८ तास आधी जमा केली पाहिजे.

कंपनी अधिनियम, २०१३ ("अधिनियम") च्या कलम १०८ च्या तरतुदी सहवाचता वेळोवेळी सुधारित कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ चा नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ ("लिस्टिंग रेग्युलेशन्स") चे रेग्युलेशन ४४ ला अनुसरून कंपनी तिच्या सर्व सभासदांना रिमोट ई-व्होटिंगची सुविधा देऊ करत आहे.

केवळ सोमवार, २३ सप्टेंबर, २०१९ ह्या ("कट-ऑफ डेट") रोजीस सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीज ठेवत असलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत (इलेक्ट्रॉनिक भागधारणाच्या बाबतीत) ज्यांचे नाव असेल ती व्यक्तीच रिमोट ई-व्होटिंगची सुविधा वापरण्यास तसेच एजीमच्या ठिकाणी मतदान करण्यास हक्कदार असेल.

कोणतीही व्यक्ती वार्षिक अहवाल पाठविण्याच्या तारखेनंतर कंपनीची सभासद झाली असेल आणि कट-ऑफ डेट रोजीस शेअर्स धारण करत असेल ती सूचना, वार्षिक अहवाल आणि ई-व्होटिंग फॉर्म मिळविण्यासाठी त्याचा/तिचा नोंदणीकृत फोलिओ क्र./डीपी आयडी आणि क्लायंट आयडी नमूद करून रजिस्ट्रार अँड ट्रान्स्फर एजंट कार्व्हीकडे एक विनंती पाठवू शकतात.

रिमोट ई-व्होटिंग गुरुवार, २६ सप्टेंबर, २०१९ रोजी (स. १०.०० वा. भा.प्र.वे.) सुरू होईल आणि रविवार, २९ सप्टेंबर, २०१९ रोजी (सं. ५.०० वा. भा.प्र.वे.) संपेल, त्यानंतर ई-व्होटिंगची अनुमती नसेल. त्यानंतर, रिमोट ई-व्होटिंगसाठी कार्व्हीकडून रिमोट ई-व्होटिंग मॉड्युल निष्क्रीय केले जाईल. एकदा का सभासदाने रिमोट ई-व्होटिंगद्वारा ठरावावर मत दिले/मते दिलीत की, त्यानंतर त्यात अंशत: किंवा अन्यप्रकारे बदल करता येणार नाही. रिमोट ई-व्होटिंग वैयकल्पिक आहे. मत देण्याच्या पध्दतींचे तपशील एजीएमच्या सूचनेत उपलब्ध आहेत, कंपनीची वेबसाईट **www.rinfra.com** वर आणि रिमोट ई-व्होटिंग एजन्सीची वेबसाईट म्हणजेच **https://evoting.karvy.com** वर प्रदर्शित केले आहेत.

ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारा आधी त्यांचे मत दिले नाही त्या एजीएममध्ये हजर असणाऱ्या सभासदांसाठी मतदानाची सुविधा उपलब्ध केली जाईल. रिमोट ई-व्होटिंगद्वारा त्याचा/तिचा मताधिकार वापरल्या नंतरही सभासद एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात, परंतु त्यांना एजीएममध्ये पुन्हा मत देण्याची अनुमती दिली जाणार नाही.

संचालक मंडळाने मतदान प्रक्रिया तपासण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून मे. दयाल अँड लोहिया, चार्टर्ड अकाऊंटंट्सचे भागीदार श्री. अनिल लोहिया किंवा ते नसल्यास, श्री. रिंकीत किरण उचाट यांची नेमणूक केली आहे.

एजीएम संपल्यापासून अठ्ठेचाळीस तासांत मतदानाचे निकाल घोषित करून बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडकडे सादर केले जातील आणि ते तपासणी अधिकाऱ्यांच्या अहवालासह कंपनीची वेबसाईट **www.rinfra.com** वर त्याचप्रमाणे कार्व्हीची वेबसाईट **www.karvyfintech.com** वर अपलोड केले जातील.

अधिनियमाच्या कलम १३६ अंतर्गत असे दस्तावेज प्राप्त करण्यास जे अन्यथा हक्कदार असतील अशा व्यक्तींना लेखी विनंती केल्यावर देखील अन्य बाबींसह वित्तीय विवरणे व अहवालांचा पूर्ण संच असलेल्या संपूर्ण संक्षिप्त वार्षिक अहवाल उपलब्ध होईल. ह्या कारणास्तव, सभासद कंपनीला तिच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर किंवा रजिस्ट्रार अँड ट्रान्स्फर एजंट - कार्व्ही फिनटेक प्रायव्हेट लिमिटेड (युनिट: रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड), कार्व्ही सेलेनियम टॉवर-बी, प्लॉट क्र. ३१ व ३२, सर्व्हे क्र. ११६/२२, ११५/२४, ११५/२५, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद-५०००३२ येथे लेखी पत्र देऊ शकतात. संक्षिप्त आणि संपूर्ण वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट : **www.rinfra.com** वरूनही पाहाता येईल.

रिमोट ई-व्होटिंगशी संबंधित चौकशी/तक्रारींच्या संबंधात कंपनी सेक्रेटरींशी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा ई-मेल द्वारा **rinfra@karvy.com** वर संपर्क साधावा किंवा ९१ ४० ६७१६ १५०० वर कॉल करा किंवा कृपया कार्व्ही ची वेबसाईट **https://evoting.karvy.com** वर उपलब्ध हेल्प आणि एफएक्युज सेक्शनला भेट द्यावी किंवा टोल फ्री क्र. १८०० ४२५० ९९९ वर संपर्क साधावा.

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडसाठी
परेश राठोड
कंपनी सेक्रेटरी

**ठिकाण :** मुंबई
**दिनांक :** ७ सप्टेंबर, २०१९

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
सीआयएन : एल७५१००एमएच१९२९पीएलसी००१५३०
नों. कार्यालय : रिलायन्स सेंटर, तळमजला, १९ वालचंद हिराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४००००१.
दू.: +९१ २२ ४३०३ १०००, फॅक्स; +९१ २२ ४३०३ ३६६४
वेबसाई : **www.rinfra.com** ई-मेल : **rinfra.investor@relianceada.com**